लोकमत

# दुसऱ्यांचा सन्मान करा, तुमचाही होईल

## अनुराग सक्सेना : शिवाजी विद्यापीठात राष्ट्रीय एकात्मता शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दुसऱ्याचा सन्मान करायला शिका, तरच तुम्हाला सन्मान मिळेल, असे प्रतिपादन सैन्यदलातील भरती विभागाचे कोल्हापुरातील संचालक कर्नल अनुराग सक्सेना यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात त्यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. बादशहा होते. कर्नल सक्सेना म्हणाले, जीवन जगताना आपल्यासमोर ध्येय असले पाहिजे. जितके ध्येय मोठे तेवढे कष्ट अधिक असतात. जीवनात वेळेला महत्त्व आहे. योग्यवेळी योग्य कर्तव्य केल्यास यश निश्चितपणे मिळते. मी ऐवढे केले, मला हे मिळालेच पाहिजे, असे करू नये. वेळ, कष्ट, सन्मान, नैतिकता आणि प्रामाणिकपणा याच्या जोरावर सैन्यदलात आला, तर भवितव्य उज्ज्वल आहे.

या कार्यक्रमात डॉ. डी. के. गायकवाड यांच्या हस्ते कर्नल सक्सेना यांचा सत्कार करण्यात आला. डॉ. अंकुश दळवी यांनी प्रास्ताविक केले. श्रुती पाटील, अल्मास खान आणि प्रा. पी. आर. माळी यांनी सूत्रसंचालन केले. दरम्यान, सकाळच्या सत्रात दत्ता पाटील आणि सूरज पाटील यांनी शिबिरार्थिंना योगाबाबतची माहिती दिली.

### प्रेम देशावर करा

**दुपारच्या सत्रात प्रा. संजय ठिगळे यांनी राष्ट्रीय एकात्मतेमध्ये युवकांची भूमिका या विषयावर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, जो युवक वेळेचे पालन कटाक्षाने करतो, त्याला काळाचे भान असते, तोच प्रगती करतो. प्रेम करायचे असेल, तर देशावर करा. या कार्यक्रमास प्रा. सदाशिव मोरे, आदी उपस्थित होते.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2018
पुण्यनगरी

# राष्ट्रनिर्मितीत युवकांचे योगदान महत्त्वाचे : प्रा. संजय ठिगळे

कोल्हापूर / प्रतिनिधी :

युवक हा देशाचा आत्मा आहे. युवकांचे राष्ट्रनिर्मितीमध्ये महत्त्वाचे योगदान असून प्रत्येकाने आपापली जबाबदारी उचलली पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. संजय ठिगळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या राष्ट्रीय एकात्मता शिबिरात 'राष्ट्रीय एकात्मतेमध्ये युवकांची जबाबदारी' या विषयावर ते बोलत होते.

प्रा. संजय ठिगळे म्हणाले, युवकांनी आपल्याबरोबरच देशाचाही विचार केला पाहिजे. एनएसएसमध्ये स्वतःबरोबरच देशावरही प्रेम करायला शिकवले जाते. शिबिरातून परत जाताना युवकांनी राष्ट्रीय एकात्मतेची भावना सोबत घेऊन जावी. राष्ट्रीय एकात्मतेचा ध्यास हा सर्वांच्या हिताचा आहे. तो देशाचा सर्वांगीण विकासाचा असून दुष्ट प्रवृत्ती रोखण्यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजेत, तर दुसऱ्या सत्रमामध्ये कर्नल अनुराग सक्सेना यांनी 'भारतीय सैन्य' या विषयावर तरुणांना मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यापीठाचे एनएसएस समन्वयक डी. के. गायकवाड यांनी 'योग' या विषयावर शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. सायंकाळच्या सत्रात विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक शिबिरामध्ये सहभाग घेतला.

लोकमत

# समाजमाध्यमांच्या वापरासंबंधी मार्गदर्शन गरजेचे

## महावीर देसाई : शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** समाजाच्या अभिव्यक्तीसाठी समाजमाध्यमे उदयास आली असून, ती आता समाज जीवनाचा श्वास बनत आहेत. त्यांच्या सकारात्मक, नकारात्मक परिणामांची चर्चा करुन, त्यांच्या वापरासंबंधीच्या मार्गदर्शनाची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन श्री आचार्यरत्न देशभूषण शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह महावीर देसाई यांनी केले.

महावीर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग आयोजित शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेच्या ११ व्या राज्यस्तरीय अधिवेशनाच्या व राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र परिषदेचे सचिव डॉ. सतीश देसाई, तर डॉ. आर. बी. पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. देसाई म्हणाले, उद्याचा भारत देश घडविण्यात समाजमाध्यमांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असेल. या परिषदेमध्ये डॉ. जगन्नाथ कराडे, प्रतिमा पवार, अर्चना कांबळे-जगतकर, दयावती पाडळकर, स्मिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. समन्वयक डॉ. उषा पाटील यांनी प्रास्ताविक केले.

परिचय लेफ्टनंट उमेश वांगदरे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. श्रद्धा पाटील व प्रा. संध्या जाधव यांनी केले. प्रा. अंकुश गोंडगे यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. पी. लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद पार पडली.

### व्यक्तीचे अस्तित्व जगाच्या पटलावर

बीजभाषक डॉ. रामचंद्र भिसे म्हणाले, समाजमाध्यमांनी व्यक्तीचे अस्तित्व जगाच्या पटलावर आणले. व्यक्तिगत अभिव्यक्तीची संधी या माध्यमांमुळे प्राप्त झाली आहे. ही माध्यमे वापरासाठी वेळेचे व ठिकाणाचे बंधन राहत नाही. यांच्यामुळे व्यक्तिमत्त्व व विकासास चालना मिळते; परंतु यांच्यामुळे वैयक्तिक आणि जिवंत संवाद संपुष्टात आलेला आहे. वैयक्तीक माहितीची चोरी होत आहे. मानसिक आजार मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत. या माध्यमांचा संयमाने वापर करणे गरजेचे आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 DEC 2018
पुण्यनगरी

# विद्यापीठात २४ रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे सोमवार, दि. २४ रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये 'स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाचे सचिव विकास खारगे यांचे प्रमुख मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित राहणार आहेत. यावेळी शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे, अशी माहिती केंद्राचे समन्वयक डॉ. पी. एस. कांबळे यांनी दिली.

सकाळ

# स्पर्धा परीक्षेबाबत सोमवारी मार्गदर्शन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्वपरीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे सोमवारी (ता. २४ ) सकाळी ११ वाजता मानव्यशास्त्र इमारतीत 'स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवेतील संधी' या व्याख्यानाचे आयोजन केले आहे.  वनविभागाचे सचिव आयएएस अधिकारी विकास खारगे मार्गदर्शन करणार आहेत. कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
20/12/2018  Page No. 1

# विद्यापीठात स्पर्धा परीक्षेबाबत व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील सेवा पूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने सोमवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये 'स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. त्यात राज्य शासनाच्या वनविभागाचे सचिव विकास खारगे मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, तर शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी पत्रकाद्वारे दिली.

# विद्यापीठमध्ये स्पर्धा परीक्षा, प्रशासकीय सेवेतील संधी विषयावर मार्गदर्शन

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील सेवापूर्व परीक्षा मार्गदर्शन केंद्राच्या वतीने सोमवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र इमारतीमध्ये 'स्पर्धा परीक्षा व प्रशासकीय सेवेतील संधी' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाचे सचिव विकास खारगे हे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित राहणार आहेत. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक प्रा. डॉ. पी. एस. कांबळे यांनी केले आहे.